महाराष्ट्र राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी लागू करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**परिपत्रक क्रमांक- पविआ-२०११/प्र.क्र.१८५/पदुम-३**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दि. ४ मार्च, २०१५.**

**वाचा :-** विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा निर्णय क्र. ३६३/बी, दि. ४ मार्च, २०१५

भारतीय राज्य घटनेच्या कलम ४८ मधील मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र शासनाने १९७६ चा प्राणी रक्षण कायदा राज्यात लागू केला. सदर कायद्यान्वये महाराष्ट्र राज्यात गाय व वासरु यांच्या कत्तलीस प्रतिबंध होता. महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) विधेयक, १९९५ महाराष्ट्र विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये जुलै, १९९५ साली मंजूर करण्यात आले. व १९९६ मध्ये मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले होते. आता सदर विधेयकास मा. राष्ट्रपती यांची मान्यता प्राप्त झालेली असून, दि. ०४ मार्च, २०१५ पासून राज्यात संपूर्ण गोवंश-हत्याबंदी (सुधारणा) कायदा लागू करण्यात येत आहे. (सोबत प्रत)

त्यानुसार, सर्व संबंधितांनी सदर कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दक्षता घ्यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(महेश पाठक)**
**सचिव (पदुम), महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक
४. विधानसभा सदस्य (सर्व)
५. विधानपरिषद सदस्य (सर्व)
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग), मंत्रालय, मुंबई
८. अप्पर मुख्य सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
९. अप्पर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई
११. विभागीय आयुक्त (सर्व)

१२. आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर परिपत्रक सर्व क्षेत्रिय कार्यालयांना तातडीने कळवावे.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४. संचालक, प्रदुषण नियंत्रण मंडळ, बांद्रा, मुंबई
१५. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. पोलिस आयुक्त, (सर्व)
१७. जिल्हाधिकारी, (सर्व)
१८. पोलिस अधिक्षक, (सर्व)
१९. विभागीय आयुक्त, (सर्व)
२०. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व)
२१. महाव्यवस्थापक, पशुवधगृह देवनार, गोवंडी, मुंबई
२२. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, (सर्व)
२३. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२४. कृषि व पदुम विभाग, कार्यासन-पदुम-४
२५. निवड नस्ती (पदुम-३)

महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदा संनियंत्रण समिती, मुंबई
नवीन प्रशासकीय इमारत, १२ वा मजला.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ४] बुधवार, मार्च ४, २०१५/फाल्गुन १३, शके १९३६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.**—महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १-४ |

दिनांक २६ फेब्रुवारी २०१५ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. सईद,**
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.**

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ४ मार्च २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९७७ चा महा.९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सेहेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या पूर्ण शीर्षकाची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) यामधील, पूर्ण शीर्षकामध्ये " गायींची कत्तल करण्यास मनाई " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " इतर विवक्षित प्राण्यांचे रक्षण करण्याची " या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" दुधासाठी, पैदाशीसाठी, ओझी वाहण्याच्या कामासाठी किंवा शेतीविषयक प्रयोजनांसाठी उपयुक्त असलेल्या गायींची, वळूंची व बैलांची कत्तल करण्यास मनाई करणे आणि त्यांचे रक्षण करणे व उक्त योजनांसाठी उपयुक्त असलेल्या इतर विवक्षित प्राण्यांचे रक्षण करण्याकरिता त्यांची कत्तल करण्यावर निर्बंध घालणे यांसाठी ".

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या उद्देशिकेची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या उद्देशिकेमधील " गायींची कत्तल करण्यास मनाई " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " इतर विवक्षित प्राण्यांचे रक्षण करण्याची " या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" दुधासाठी, पैदाशीसाठी, ओझी वाहण्याच्या कामासाठी किंवा शेतीविषयक प्रयोजनांसाठी उपयुक्त असलेल्या गायींची, वळूंची व बैलांची कत्तल करण्यास मनाई करणे आणि त्यांचे रक्षण करणे आणि उक्त प्रयोजनांसाठी उपयुक्त असलेल्या इतर विवक्षित प्राण्यांचे रक्षण करण्याकरिता त्यांची कत्तल करण्यावर निर्बंध घालणे यांसाठी ".

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १ मधील, पोट-कलम (४) मध्ये, " गायींना " या मजकुरानंतर " वळुंना किंवा बैलांना " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये,—

(अ) " गायींची " या शब्दानंतर ", वळूंची किंवा बैलांची " हा मजकूर तसेच " गाय " या शब्दानंतर ", वळू किंवा बैल " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(ब) समास टीपेमधील, " गायींची " या शब्दानंतर " , वळूंची आणि बैलांची " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ यामध्ये कलमे ५अ ते ५ड समाविष्ट करणे.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

कत्तल करण्यासाठी गाय, वळू किंवा बैल याची वाहतूक आणि निर्यात करण्यास प्रतिबंध.

**" ५अ.** (१) कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून किंवा गाय, वळू किंवा बैल यांची कत्तल करण्यात येईल किंवा कत्तल केली जाण्याची शक्यता आहे याची माहिती असतानाही, राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून, राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणी, ती गाय, वळू किंवा बैल यांची अशी कत्तल करण्याच्या प्रयोजनासाठी, वाहतूक करणार नाही किंवा वाहतूक करण्यासाठी देणार नाही किंवा वाहतूक करण्याची व्यवस्था करणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून किंवा कोणतीही गाय, वळू किंवा बैल यांची कत्तल करण्यात येईल किंवा कत्तल केली जाण्याची शक्यता आहे याची माहिती असतानाही, एकतर प्रत्यक्षरीत्या किंवा त्याच्या अभिकर्त्यामार्फत किंवा नोकरामार्फत किंवा त्याच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही अन्य व्यक्तींमार्फत, अशी गाय, वळू किंवा बैल यांची कत्तल करण्याच्या प्रयोजनासाठी, निर्यात करणार नाही किंवा महाराष्ट्र राज्याबाहेर निर्यात करण्याची व्यवस्था करणार नाही.

**५ब.** कोणतीही व्यक्ती, कत्तल करण्यासाठी किंवा कोणतीही गाय, वळू किंवा बैल यांची कत्तल करण्यात येईल हे माहीत असून किंवा तसे मानण्यास कारण असताना, अशी गाय, वळू किंवा बैल यांची खरेदी करणार नाही, विक्री करणार नाही किंवा त्याची अन्यथा विल्हेवाट लावणार नाही किंवा खरेदी करण्यासाठी, विक्री करण्यासाठी किंवा अन्यथा विल्हेवाट लावण्यासाठी देणार नाही. गाय, वळू किंवा बैल यांची अन्य कोणत्याही पद्धतीने विक्री, खरेदी करण्यास, विल्हेवाट लावण्यास प्रतिबंध.

**५क.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कत्तल केलेल्या कोणत्याही गायीचे, वळुचे किंवा बैलाचे मांस स्वत:च्या ताब्यात ठेवणार नाही. गाय, वळू किंवा बैल यांचे मांस ताब्यात ठेवण्यास मनाई.

**५ड.** कोणतीही व्यक्ती, महाराष्ट्र राज्याबाहेर कत्तल केलेली कोणतीही गाय, वळू किंवा बैल याचे मांस आपल्या ताब्यात ठेवणार नाही.”. महाराष्ट्र राज्याबाहेर कत्तल कलेली गाय, वळू किंवा बैल यांचे मांस ताब्यात ठेवण्यास मनाई.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ८ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येतील :—

“(३) पोलीस उप-निरीक्षकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला कलम ५-अ, ५-ब, ५-क किंवा ५-ड यांच्या तरतुदींचे अनुपालन केले जावे या दृष्टीने उक्त कलमांच्या तरतुदींचे पालन करण्यात आलेले आहे, याविषयी स्वत:ची खात्री करून घेण्याकरता,—

(अ) गाय, वळू किंवा बैल यांची निर्यात करण्यासाठी वापरण्यात आलेल्या किंवा वापर करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही वाहनात प्रवेश करता येईल, ते थांबवता येईल आणि त्याची झडती घेता येईल किंवा कोणत्याही व्यक्तीला त्या वाहनात प्रवेश करण्याचा, ते थांबवण्याचा आणि त्याची झडती घेण्याचा प्राधिकार देता येईल.

(ब) ज्याच्या बाबतीत कलमे ५-अ, ५-ब, ५-क किंवा ५-ड यांच्या कोणत्याही तरतुदींचा भंग करण्यात आलेला आहे, भंग करण्यात येत आहे किंवा भंग केला जाणार आहे अशी गाय, वळू किंवा बैल, ज्या वाहनामध्ये ते आढळून आले असतील त्या वाहनांसह जप्त करता येईल किंवा जप्त करण्याचा प्राधिकार देता येईल आणि त्यानंतर अशा प्रकारे जप्त करण्यात आलेली गाय, वळू किंवा बैल आणि वाहने न्यायालयात हजर करण्यासाठी आणि ती हजर करण्यात येईतोपर्यंत त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करता येतील किंवा करण्याचा प्राधिकार देता येईल:

परंतु, न्यायचौकशी होईपर्यंत जप्त करण्यात आलेली गाय, वळू किंवा बैल केवळ नजिकच्या ठिकाणी असलेले गोसदन, गोशाळा, पांजरपोळ, हिंसा निवारण संघ आणि अशा प्रकारे अभिरक्षेत ठेवण्याची इच्छा असलेल्या अशा प्रकारच्या अन्य प्राणी कल्याण संघटना यांच्या स्वाधीन करण्यात येईल, आणि न्यायालयाच्या आदेशानुसार, जोपर्यंत ते उक्त संस्था/संघटना यांच्यापैकी कोणत्याही संस्थेच्या/संघटनेच्या अभिरक्षेत राहतील त्या कालावधीसाठी आरोपी त्यांच्या देखभालीसाठी येणारा खर्च देण्यास दायी असेल.

१९७४ चा २. (४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १०० च्या झडती आणि जप्ती संबंधातील तरतुदी, शक्य होईल तेथवर या कलमाखालील झडती आणि जप्ती यांना लागू होतील. ”.

(ब) समास टीपेऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“ प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा, जप्त करण्याचा आणि अभिरक्षेत ठेवण्याचा अधिकार.”

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ९ ची सुधारणा.

(अ) “ या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचा ” या मजकुराऐवजी, “कलम ५, ५-अ किंवा ५-ब च्या तरतुदींचा ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) “ सहा महिन्यांपर्यंत ” या मजकुराऐवजी, “ पाच वर्षापर्यंत ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(क) "एक हजार रुपयापर्यंत " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ड) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

परंतु, न्यायालयाने न्यायनिर्णयामध्ये नोंद करून ठेवावयाच्या विशेष व पुरेशा कारणांवरून असेल ते खेरीजकरून, इतर बाबतीत, असा कारावास सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि असा दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही;

(ई) समास टीपेऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

" कलम ५, ५-अ किंवा ५-ब याच्या उल्लंघनाबद्दल शास्ती. ".

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ मध्ये कलमे ९-अ आणि ९-ब समाविष्ट करणे.

" **९-अ.** जो कोणी कलमे ५-क, ५-ड किंवा ६ यांच्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, अपराधसिद्धीनंतर एक वर्षापर्यंत असू शकेल अशी कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशी दंडाची शिक्षा होईल. कलमे ५-क, ५-ड किंवा ६ यांचे उल्लंघन करण्याबद्दल शास्ती.

**९-ब.** या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल, कलम ९ किंवा ९-अ अन्वये, शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या कोणत्याही न्यायचौकशीमध्ये, गाय, वळू किंवा बैल यांची कत्तल, वाहतूक, राज्याबाहेर निर्यात, विक्री, खरेदी किंवा त्यांचे मांस ताब्यात ठेवणे हे या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून करण्यात आलेले नव्हते, हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर असेल. ". पुरावा सादर करण्याची जबाबदारी आरोपींवर असणे.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १० ची सुधारणा.

(अ) " दखलपात्र " या शब्दानंतर "आणि बेजमानती " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) समास टीपेमध्ये, " दखलपात्र " या शब्दानंतर " आणि बेजमानती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ११ ची सुधारणा.

" कलम ९" या मजकुरानंतर " किंवा कलम ९-अ " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनयम क्रमांक ९ याच्या कलम १४ ची सुधारणा.

(अ) खंड (अ) मध्ये, " गायीखेरीज " या शब्दाऐवजी "गाय, वळू व बैल यांच्याखेरीज " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) खंड (ब) मध्ये, " गायीखेरीज " या शब्दाऐवजी " गाय, वळू व बैल यांच्याखेरीज " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(क) खंड (क) मध्ये, " गायीखेरीज " या शब्दाऐवजी " गाय, वळू व बैल यांच्याखेरीज " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१३.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीतील " वळू, बैल " हे शब्द वगळण्यात येतील. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनयम क्रमांक ९ याच्या अनुसूचीची सुधारणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ४(३)] बुधवार, मार्च ४, २०१५/फाल्गुन १३, शके १९३६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

### असाधारण क्रमांक ११

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Animal Preservation (Amendment) Act, 1995 (Mah. Act No. V of 2015), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. SAYEED,
Principal Secretary and R.L.A. to Government,
Law and Judiciary Department.

### MAHARASHTRA ACT No. V OF 2015.

(First published after having received the assent of the President in the "*Maharashtra Government Gazette*", on the 4th March 2015).

An Act to amend the Maharashtra Animal Preservation Act, 1976.

Mah. IX of 1977. WHEREAS it is expedient to amend the Maharashtra Animal Preservation Act, 1976, for the purposes hereinafter appearing; It is hereby enacted in the Forty-sixth Year of the Republic of India as follows :—

Short title. **1.** This Act may be called the Maharashtra Animal Preservation (Amendment) Act, 1995.

Mah. IX of 1977. Amendment of long title of Mah. IX of 1977. **2.** In the Maharashtra Animal Preservation Act, 1976 (hereinafter referred to as " the principal Act"), in the long title, for the portion beginning with the words "of cows" and ending with the words "agricultural purposes", the following shall be substituted, namely :—

" and preservation of cows, bulls and bullocks useful for milch, breeding, draught or agricultural purposes and for restriction on slaughter for the preservation of certain other animals suitable for the said purposes".

Amendment of preamble to Mah. IX of 1977.

**3**. In the preamble to the principal Act, for the portion beginning with the words "of cows" and ending with the words "agricultural purposes", the following shall be substituted, namely :—

" and preservation of cows, bulls and bullocks useful for milch, breeding, draught or agricultural purposes and for restriction on slaughter for the preservation of certain other animals suitable for the said purposes".

Amendment of section 1 of Mah. IX of 1977.

**4**. In section 1 of the principal Act, in sub-section *(4)*, after the word "cows" the words ", bulls and bullocks," shall be inserted.

Amendment of section 5 of Mah. IX of 1977.

**5**. In section 5 of the principal Act,—

(*a*) after the word "cow" the words ", bull or bullock" shall be inserted;

(*b*) in the marginal note, after the word "cows" the words ", bulls and bullocks" shall be added.

Insertion of sections 5A to 5D inMah. IX of 1977.

**6**. After section 5 of the principal Act, the following sections shall be inserted, namely:—

Prohibition on transport and export of cow, bull or bullock for slaughter.

"**5A**. *(1)* No person shall transport or offer for transport or cause to be transported cow, bull or bullock from any place within the State to any place outside the State for the purpose of its slaughter in contravention of the provisions of this Act or with the knowledge that it will be or is likely to be, so slaughtered.

*(2)* No person shall export or cause to be exported outside the State of Maharashtra cow, bull or bullock for the purpose of slaughter either directly or through his agent or servant or any other person acting on his behalf, in contravention of the provisions of this Act or with the knowledge that it will be or is likely to be slaughtered.

Prohibition on sale, purchase, disposal in any other manner of cow, bull or bullock.

**5B**. No person shall purchase, sell or otherwise dispose of or offer to purchase, sell or otherwise dispose of any cow, bull or bullock for slaughter or knowing or having reason to believe that such cow, bull or bullock shall be slaughtered.

Prohibition on possession of flesh of cow, bull or bullock.

**5C**. Notwithstanding anything contained in any other law for the time being in force no person shall have in his possession flesh of any cow, bull or bullock slaughtered in contravention of the provisions of this Act.

Prohibition on possession of flesh of cow, bull or bullock slaughtered outside the State of Maharashtra.

**5D**. No person shall have in his possession flesh of any cow, bull or bullock slaughtered outside the State of Maharashtra.".

**7.** In section 8 of the principal Act,— Amendment of section 8 of Mah. IX of 1977.

(*a*) after sub-section (*2*), the following sub-sections shall be added, namely :—

"(*3*) Any Police Officer not below the rank of Sub-Inspector or any person authorised in this behalf by the State Government, may, with a view to securing compliance of the provisions of sections 5A, 5B, 5C or 5D, for satisfying himself that the provisions of the said sections have been complied with may,—

(*a*) enter, stop and search , or authorise any person to enter, stop and search any vehicle used or intended to be used for the export of cow, bull or bullock ;

(*b*) seize or authorise the seizure of cow, bull or bullock in respect of which he suspects that any provision of sections 5A, 5B, 5C or 5D has been, is being or is about to be contravened, alongwith the vehicles in which such cow, bull or bullock are found and there after take or authorise the taking of all measures necessary for securing the production of such cow, bull or bullock and the vehicles so seized, in a court and for their safe custody pending such production:

Provided that pending trial, seized cow, bull or bullock shall be handed over to the nearest *Gosadan*, *Goshala*, *Panjrapole*, *Hinsa Nivaran Sangh* or such other Animal Welfare Organizations willing to accept such custody and the accused shall be liable to pay for their maintenance for the period they remain in custody with any of the said institutions or organizations as per the orders of the court.

2 of 1974. (*4*) The provisions of section 100 of the Code of Criminal Procedure, 1973 relating to search and seizure shall, so far as may be, apply to searches and seizures under this section.".

(*b*) for the marginal note, the following shall be substituted, namely :— " Power of entry, search, seizure and custody.".

**8.** In section 9 of the principal Act,— Amendment of section 9 of Mah. IX of 1977.

(*a*) for the words " any of the provisions of this Act" the words and figures "the provisions of sections 5, 5A or 5B" shall be substituted;

(*b*) for the words " six months" the words " five years" shall be substituted;

(*c*) for the words "one thousand rupees" the words "ten thousand rupees" shall be substituted;

(*d*) the following proviso shall be added, namely :—

" Provided that except for special and adequate reasons to be recorded in the judgement of the court such imprisonment shall not be of less than six months and such fine shall not be less than one thousand rupees.";

(*e*) for the marginal note, the following shall be substituted, namely :—

" Penalty for contravention of sections 5, 5A or 5B.".

**9.** After section 9 of the principal Act, the following sections shall be inserted, namely :— Insertion of sections 9A and 9B in Mah. IX of 1977.

Penalty for contravention of sections 5C, 5D or 6.

"**9A**. Whoever contravenes the provisions of sections 5C, 5D or 6 shall on conviction be punished with imprisonment for a term which may extend to one year or fine which may extend to two thousand rupees.

Burden of proof on accused.

**9B.** In any trial for an offence punishable under sections 9 or 9A for contravention of the provisions of this Act, the burden of proving that the slaughter, transport, export outside the State, sale, purchase or possession of flesh of cow, bull or bullock was not in contravention of the provisions of this Act, shall be on the accused.".

Amendment of section 10 of Mah. IX of 1977.

**10**. In section 10 of the principal Act,—

(*a*) the words "and non-bailable" shall be added at the end;

(*b*) in the marginal note, the words " and non-bailable" shall be added.

Amendment of section 11 of Mah. IX of 1977.

**11**. In section 11 of the principal Act, after the word and figure " section 9 " the words, figure and letter "or section 9A" shall be added.

Amendment of section 14 of Mah. IX of 1977.

**12**. In section 14 of the principal Act,—

(*a*) in clause (*a*), after the word " cow" the words ", bull and bullock" shall be inserted;

(*b*) in clause (*b*), after the word " cow" the words ", bull and bullock" shall be inserted;

(*c*) in clause (*c*), after the word "cow" the words ", bull and bullock" shall be inserted.

Amendment of Schedule to Mah. IX of 1977.

**13**. In the Schedule appended to the principal Act, the words " bulls, bullocks," shall be deleted.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.